**ठळक बातम्या**

- येत्या १ एप्रिलपासून देशभरात जनगणना २०२७ च्या प्रक्रियेला सुरुवात
- तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी अधिसूचना जारी, उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू
- देशभरातल्या २१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सार्वजनिक वितरण प्रणालीमार्फत केरोसीनचं वितरण करायला केंद्र सरकारची परवानगी
- पर्शियन आखातातलं इराणचं खर्ग बेट ताब्यात घेण्याचा डोनाल्ड ट्रम्प यांचा इशारा

**आणि**

- आशियाई मुष्टीयुद्ध स्पर्धेत भारताच्या प्रीती पवार आणि दीपक यांची विजयी सलामी

<><><><><>

येत्या १ एप्रिलपासून देशभरात जनगणना २०२७ च्या प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. देशातली ही १६ वी आणि स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना असणार आहे. देशाचे महानिबंधक आणि जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण यांनी आज दिल्लीत बातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली.....

**होल्ड- बाईट - मृत्युंजय कुमार**

या प्रक्रियेअंतर्गत १ एप्रिल ते ३० सप्टेंबर या कालावधीदरम्यानच्या ३० दिवसांच्या कालावधीत राज्य सरकारं आणि केंद्रशासित प्रदेशांकडून घरांची यादी तयार करण्याचं काम केलं जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

यंदाच्या जनगणना प्रक्रियेअंतर्गत पहिल्यांदाच स्वयंगणनेची सुविधा उपलब्ध करून दिली गेली आहे, याअंतर्गत घरांची यादी करण्याचं काम सुरू होण्यापूर्वीच्या १५ दिवसांच्या कालावधीत नागरिकांना ही सुविधा वापरता येणार असल्याचं त्यांनी सांगितलं. स्वयंगणनेसाठीचं पोर्टल १६ भाषांमध्ये उपलब्ध करून दिलं आहे अशी माहितीही त्यांनी दिली.

जनगणनेसाठीच्या पहिल्या टप्प्यातल्या प्रश्नांची अधिसूचना आधीच जारी केली आहे, तर दुसऱ्या टप्प्यासाठीचे प्रश्न लवकरच प्रसिद्ध केले जातील. जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात जातिनिहाय गणना केली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><>**

तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी भारतीय निवडणूक आयोगानं अधिसूचना जारी केली असून आजपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. तामिळनाडू विधानसभेच्या सर्व म्हणजेच २३४ मतदारसंघांसाठी एकाच टप्प्यात मतदान होईल, तर पश्चिम बंगालमधल्या १५२ मतदारसंघांसाठी पहिल्या टप्प्यात २३ एप्रिलला मतदान होईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख ६ एप्रिल असून ९ एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेता येतील.

दरम्यान निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालची चौथी मतदार यादी काल रात्री प्रसिद्ध केली. आयोगानं दिलेल्या माहितीनुसार, कालच्या यादीमध्ये सुमारे २ लाख नवीन मतदारांच्या नावांचा समावेश असून या चारही याद्या मिळून आतापर्यंत जवळपास ३५ लाख नावे प्रसिद्ध करण्यात आली आहेत.

**<><><><>**

प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी आज आसाममधे मेरा बुथ, सबसे मजबूत या उपक्रमांतर्गत पक्षाच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला. गेल्या दशकभरात झालेल्या आसामच्या प्रगतीतून राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं यश दिसून येतं असं ते यावेळी म्हणाले. यावेळीही आसाममधले मतदार भाजपाला निवडून देतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. काँग्रेसनं कायम बोडोलँडची फसवणूक केल्याची टीका त्यांनी केली....

**होल्ड- बाईट - मोदी आसाम**

**<><><><>**

देशभरातल्या २१ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सार्वजनिक वितरण प्रणालीमार्फत उच्च दर्जाच्या केरोसीनचं वितरण करण्याची परवानगी केंद्र सरकारनं दिली आहे. युद्धपरिस्थितीमुळे निर्माण झालेल्या इंधन तुटवड्यावर काही प्रमाणात तोडगा काढण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं सरकारनं काढलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे.

हे केरोसीन फक्त घरगुती इंधन आणि दिवाबत्तीच्या वापरासाठी असून ज्या राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सर्वसाधारणपणे केरोसीन उपलब्ध नव्हतं तिथंही ते आता उपलब्ध केलं जात आहे. याअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात सरकारी तेल कंपन्यांच्या दोन वितरण केंद्रांवर मिळून ५ हजार लिटर केरोसीन उपलब्ध करून दिलं जाणार आहे. त्वरित वितरण व्हावं यासाठी वितरकांना काही परवान्यामधून सूट दिली जाईल. हा शासन निर्णय त्वरित प्रभावानं अमलात येणार असून पुढच्या दोन महिन्यांसाठी तो लागू राहील.

<><><><><>

भारताचा ध्वज असलेल्या आणखी दोन LPG वाहक जहाजांनी ***होर्मुझ*** ची सामुद्रधुनी सुरक्षितपणे पार केली आहे. या जहाजांमध्ये सुमारे ९४ हजार टन LPG आहे. 'BW TYR' आणि 'BW ELM' ही दोन LPG वाहक जहाजं येत्या दोन दिवसांत भारताच्या किनाऱ्यावर पोहोचतील, असा अंदाज आहे. 'BW TYR' हे जहाज उद्या मुंबईत तर 'BW ELM' हे जहाज येत्या १ एप्रिलला 'न्यू मंगलोर' मध्ये पोहोचेल असा अंदाज आहे.

<><><><><>

अमेरिका आणि इस्रायलनं इराणवर हल्ला केल्यानंतर पश्चिम आशियात सुरु झालेला संघर्ष आणखी तीव्र झाला आहे. अमेरिका आणि इस्रायलनं आजही इराणवर हल्ले केले. इराणनेही आपल्यावरच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर देत कुवेत मधला एक मोठा पाणी आणि वीज प्रकल्प, तसंच इस्रायलच्या उत्तर भागातल्या तेल शुद्धीकरण कारखान्यांवर हल्ला केला.

दरम्यान, एकीकडे वाटाघाटीबद्दलच्या चर्चा सुरु असतानाच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पर्शियन आखातातलं इराणचं खर्ग बेट ताब्यात घेण्याचा इशारा दिला. इराणनं सद्भावना म्हणून आजपासून २० तेलवाहू जहाजांना होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाण्याची परवानगी दिल्याचा दावाही ट्रम्प यांनी केला.

<><><><><>

मंगोलियात उलानबातार इथं सुरू असलेल्या आशियाई मुष्टीयुद्ध अजिंक्यपद स्पर्धा २०२६ मध्ये भारताच्या प्रीती पवार आणि दीपक यांनी विजयी सलामी दिली.

महिलांच्या ५४ किलो वजनी गटात प्रीतीनं कझाकिस्तानच्या एलीना हिचा ५ - ० असा पराभव केला. पुरुषांच्या ७० किलो वजनी गटात दीपकनं उझबेकिस्तानच्या खवासबेक याचा ३ - २ असा पराभव केला.

आता उपांत्यपूर्व फेरीत प्रीतीचा सामना मंगोलियाच्या खेळाडूसोबत होणार आहे, तर दीपकचा सामना जॉर्डनच्या झियाद याच्याशी होणार आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेटमधे आज गुवाहाटी इथं राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सामना सुरु आहे. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा चेन्नई सुपर किंग्जच्या ६ षटकात ४ बाद ४१ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

भारताच्या शीतलदेवीला २०२५ या वर्षाचा 'पॅराआर्चर ऑफ द ईयर' हा पुरस्कार जाहीर झाला आहे. तिरंदाजीत २०२५मध्ये अव्वल दर्जाची कामगिरी करणाऱ्या तिरंदाजांना जागतिक तिरंदाजी एक्झिक्युटिव बोर्डाने पुरस्कार जाहीर केले, यामध्ये जम्मू काश्मीरच्या शीतलदेवीचा समावेश आहे. जन्मपासून दोन्ही हात नसल्यामुळे पायाने तिरंदाजी करणाऱ्या शीतलदेवीने गेल्यावर्षीच्या ग्वांगजू इथल्या पॅरातिरंदाजी चषक स्पर्धेत वैयक्तिक सुवर्णपदक पटकावलं होतं. त्याचबरोबर महिलांच्या सांघिक स्पर्धेत रौप्य आणि मिश्र सांघिकमध्येही कांस्य पदक पटकावलं होतं.

<><><><><>

भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया आणि मूलभूत संरचना या जागतिक अस्थिरतेच्या काळातही मजबूत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात बोलत होत्या. जगभरातल्या सर्वच देशांचं चलन या युद्ध परिस्थितीमुळे प्रभावित झालं असून डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण होण्यामागचं कारणदेखील हेच असल्याचं त्यांनी सांगितलं.

देशातून नक्षलवादी हिंसाचार संपवण्यासाठी सरकार करत असलेल्या प्रयत्नांबद्दल लोकसभेत झालेल्या चर्चेला उत्तर देताना गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितलं की, डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी कारवायांमुळे प्रभावित भागांमधील विकासाला खीळ बसली होती, परंतु आता नरेंद्र मोदी सरकारच्या काळात या भागांपर्यंत विकास पोहोचत आहे.

//<><><><><>//